सकाळ
07-12-2022

# सायबर सुरक्षा जागृती अभियानांतर्गत मार्गदर्शन

**अकोला :** दिवसेंदीवस इंटरनेटच्या माध्यमातून सायबर क्राईमचे वाढते प्रमाण लक्षात घेता, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातर्फे अकोला जिल्ह्यामध्ये सायबर सुरक्षा जनजागृती अभियान क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने राबविल्या जात आहे. या अभियानांतर्गत बाबासाहेब धाबेकर विद्यालय बार्शीटाकळी येथे मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाईन फसवणूक कशी होते, मोबाईल मध्ये येणारे नवीन अॅप्स द्वारे डेटा कशा प्रकारे चोरी केल्या जातो आणि त्याद्वारे कशी फसवणूक होते, फेसबुक अकाऊंट कसे हॅक केले जाते, फेक वेबसाइट्स कशा ओळखाव्या याबाबत विषय तज्ञ शीतल किशोर साखरे आणि नेहा गजानन टेरे यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले आणि अशा ऑनलाइन फसवणुकीपासून कसे दूर राहावे, कोणती काळजी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती सांगितली. यावेळी, मोबाईल किंव्हा इंटरनेटच्या योग्य वापराविषयी विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली आणि सायबर सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रक वाटप करण्यात आले. हा वर्ग मुख्याध्यापक श्री काळे यांच्या परवानगीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.